**जिल्हादंडाधिकारी कार्यालय,उस्मानाबाद**

(उपचिटणीस शाखा)

दुरध्वनी क्रमांक 02472-227301 Email ID- rdc1osmanabad@gmail.com

वाचा:- 1. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 13 मार्च 2020.

2. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 14 मार्च 2020.
3. आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 चे कलम 30, 33, 34, 41 व कलम 51.
4. भारत सरकार, गृह मंत्रालय यांचे आदेश क्र. 40-3/2020-DM-I(A) दि. 30 मे 2020.
5. महाराष्ट्र शासन, महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, अधिसूचना क्र. DMU/2020/CR.92/DIsM-1 दि. 31 मे 2020, 29 जून 2020.
6. या कार्यालयाचे आदेश क्र. 2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर-26 दि. 31 मे 2020, दि. 29 जून 2020.
7. उस्मानाबाद जिल्हा बँड बँजो मालक संघटना यांचे निवेदन दि. 23.06.2020.

---

क्र.2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर- 26

दिनांकः- 10 /07/2020.

**विषय:- लॉकडाऊन कालावधीत उस्मानाबाद जिल्हयामध्ये बँड व्यवसायास परवानगी देणेबाबत.**

**आदेश:-**

ज्याअर्थी उपरोक्त वाचा क्र. 2 चे अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र शासनाने "महाराष्ट्र कोव्हीड 19 उपाययोजना नियम, 2020" प्रसिद्ध केले असून यातील नियम क्र. 3 नुसार करोना विषाणुमुळे (COVID-19) उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण यासाठी जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रात सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

ज्याअर्थी संदर्भ क्र. 5 मधील दि. 29 जून 2020 चे आदेशान्वये महाराष्ट्र शासनाने लॉकडाऊनचा कालावधी दि. 31 जुलै 2020 पर्यंत वाढविला असून लॉकडाऊनचे कालावधीत करावयाच्या कार्यवाहीबाबत मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत. त्यानुसार या कार्यालयाने संदर्भ क्र. 6 मधील दि. 29.06.2020 चा आदेश पारित केला आहे. त्यानुसार संदर्भ क्र. 6 मधील दि. 31.05.2020 रोजीचे या कार्यालयाचे आदेश कायम आहेत. दि. 31.05.2020 रोजीचे या कार्यालयाचे आदेशातील मुद्दा क्र. 5 नुसार मुद्दा क्र. 6 मध्ये नमूद केलेल्या बाबी वगळून ज्या उपक्रमांवर बंदी घातलेली नाही असे उपक्रम/बाबी चालू ठेवणेस परवानगी दिलेली आहे. ज्याअर्थी संदर्भ क्र. 7 अन्वये उस्मानाबाद जिल्हा बँड बँजो मालक संघटना यांनी बँड व्यवसायास परवानगी मिळणेबाबत विनंती केली आहे.



Scanned by CamScanner

त्याअर्थी मी दिपा मुधोळ-मुंडे, जिल्हाधिकारी, उस्मानाबाद उपरोक्त वाचा क्र. 2 अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारांनुसार **लॉकडाऊनचे कालावधीत उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये बँड व्यवसाय चालू करण्यास खालील अटी व शर्तीच्या आधारे परवानगी देत आहे.**

1. संदर्भ क्र. 4 मधील महाराष्ट्र शासनाचे आदेशानुसार फक्त लग्न समारंभास विहित केलेल्या मर्यादित व्यक्तींच्या संख्येत परवानगी देण्यात आलेली असून सामाजिक/राजकीय/क्रीडा/मनोरंजन/शैक्षणिक/ सांस्कृतिक/धार्मिक कार्यक्रम व इतर सभा संमेलने यांना परवानगी नसल्यामुळे बँड व्यावसायिकांना फक्त लग्न समारंभातच वाद्ये वाजविण्याची परवानगी राहील.
2. बँडचे ताफ्यामध्ये वाहनासह पाच व्यक्तींना सकाळी 9 ते रात्री 9 या वेळेमध्ये वाद्ये वाजविण्याची परवानगी राहील.
3. वाद्ये वाजविताना सामाजिक अंतराचे (सोशल डिस्टंसींग) पालन करणे अनिवार्य राहील.
4. वाद्य वाजविणा-या व्यक्तींनी फेस कव्हर, गॉगल्स, मास्क/स्वच्छ रुमाल, हॅण्डग्लोव्हज, सॅनिटायझर इ. चा वापर करणे बंधनकारक आहे.
5. वाद्ये वाजविण्यापूर्वी व वाजविल्यानंतर वाद्ये निर्जंतूक (Sanitize) करणे बंधनकारक आहे.
6. फक्त हाताने वाजविण्याच्या वाद्यांना परवानगी देण्यात येत असून तोंडाने वाजविण्याच्या वाद्यांना परवानगी असणार नाही.
7. बँड व्यावसायिकांनी वाद्ये वाजविताना ध्वनीप्रदूषणविषयक नियमांचा भंग करु नये.
8. बँड पथकातील वादकांनी नियमितपणे सॅनिटायझरचा वापर करावा तसेच साबणाने हात स्वच्छ धुवावेत.
9. बँड पथकातील वादकांनी वाद्ये वाजविताना डोळे, नाक व तोंडाला स्पर्श करणे कटाक्षाने टाळावे.
10. वाहनामध्ये बसून वाद्ये वाजविताना सामाजिक अंतराचे पालन करणे बंधनकारक आहे.
11. सर्दी, ताप व श्वासोच्छवास घेण्यास त्रास होणे इ. कोवीड-19 ची लक्षणे असलेल्या वादकांना बँड पथकामध्ये वाद्ये वाजविण्यास परवानगी असणार नाही.
12. 65 वर्षावरील नागरिकांनी घरीच राहणे आवश्यक असल्याने 65 वर्षांवरील वादकांना बँड पथकामध्ये वाद्ये वाजविण्यास परवानगी असणार नाही.
13. भारत सरकार व महाराष्ट्र शासनाचे आरोग्य विभागाने वेळोवेळी दिलेल्या आदेशांचे पालन करणे बंधनकारक राहील.
14. महाराष्ट्र शासन, महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, अधिसूचना क्र. DMU/2020/CR.92/DisM-1 दि. 31.05.2020 च्या परिशिष्ट 1 मध्ये नमूद केलेल्या कोव्हीड 19 चे व्यवस्थापनासंदर्भातील राष्ट्रीय सूचनांचे पालन करणे बंधनकारक राहील.

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती, संस्था अथवा संघटना उपरोक्त वाचा क्र. 2 मधील "महाराष्ट्र कोव्हीड 19 उपाययोजना नियम, 2020" चे नियम 11 नुसार, भारतीय दंड संहिता (45 ऑफ 1860) कलम 188 मधील तरतुदींनुसार दंडनिय/कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

सदर आदेशाची अंमलबजावणी आदेशाचे दिनांकापासून लागू होईल.

10/7/20

**(दिपा मुधोळ-मुंडे)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद**



Scanned by CamScanner

**प्रत:-** 1. मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.
2. मा. संचालक, आपत्ती व्यवस्थापन विभाग, मंत्रालय, मुंबई-32.

**प्रत:- आवश्यक कार्यवाहीसाठी**

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद.
2. पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद.
3. जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, उस्मानाबाद.
4. जिल्हा आरोग्य अधिकारी, उस्मानाबाद.
5. जिल्हा माहिती अधिकारी, उस्मानाबाद.
6. उपविभागीय अधिकारी तथा INCIDENT COMMANDER सर्व जिल्हा उस्मानाबाद.
7. तहसिलदार तथा INCIDENT COMMANDER सर्व जिल्हा उस्मानाबाद.
8. गट विकास अधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
9. मुख्याधिकारी सर्व नगर परिषद व नगर पंचायत जिल्हा उस्मानाबाद.
10. उस्मानाबाद जिल्हा बँड बँजो मालक संघटना.
11. सर्व संबंधितांस अनुपालनास्तव.

जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,
जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद

DISTRICT MAGISTRATE
OSMANABAD

Scanned by CamScanner